॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासनाचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने **'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना'** राबविली जाणार असून यामध्ये **इच्छुक तरूणांना सहा महिन्यासाठी कार्यप्रशिक्षणाची (अॅप्रेंटिंस) संधी** मिळणार असून **विद्यापीठाच्या विविध विभागात २९ पदांसाठी दि. ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी थेट मुलाखती होणार आहेत.**

प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करून उद्योजकांना आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हे या याजनेचे उद्दिष्टये आहेत. या योजनेत सहा महिने कार्यप्रशिक्षणाचा कालावधी राहणार असून या कालावधीतील विद्यावेतन शासनामार्फत उमेदवारांना मिळेल. नवीन शैक्षणिक धोरणात अॅप्रेंटिंसशिप वर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव त्यामुळे मिळणार आहे. सहा महिने ऑनजॉब ट्रेनिंग किंवा अॅप्रेंटिंसशिप अंतर्भुत असणारे अभ्यासक्रमाचे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत. विद्यापीठात वित्त विभाग, कायदा विभाग, शैक्षणिक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, क्रिडा विभाग, ज्ञानस्त्रोत केंद्र येथे आणि मल्टीटास्क ऑपरेटर येथे प्रशिक्षणार्थी म्हणून २९ जणांना संधी प्राप्त होणार आहे. उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२वी पास / आयटीआय / पदवीधर /पदव्युत्तर किंवा डिप्लोमाधारक अशी आहे. १२वी पास साठी प्रतिमाह सहा हजार, आयटीआय / पदविका साठी आठ हजार आणि पदवीधर / पदव्युत्तर साठी दहा हजार प्रतिमाह विद्यावेतन दिले जाणार आहे. www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर इच्छुकांनी नाव नोंदणी करावी विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्हताधार उमेदवारांनी आवश्यक त्या दस्ताऐवजाच्या मुळ, स्वसाक्षांकित प्रतीसह संलग्न केलेला मुळ अर्जासह विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमधील व्यवस्थापन परिषद सभागृहात स्वखर्चाने शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी ११ वाजता उपस्थित रहावे असे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळ शैक्षणिक अर्हता, कामांचा विभाग व इतर सूचनांचा तपशिल देण्यात आला आहे.

## बातमी क्र.२

जळगाव, दि. २३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. १८ व १९ सप्टेंबर रोजी GOLD-CT-2024 या द्वितीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी प्र-कुलगुरु तथा रसायनशास्त्र प्रशाळेतील प्रोफेसर पी.पी.माहुलीकर हे सप्टेंबर महिन्यात सेवानिवृत्त होतअसल्यामुळे त्यांच्या सेवेचा गौरव करण्यासाठी ही आंतरराष्ट्रीय परिषद विद्यापीठात होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन आयीटीचे माजी कुलगुरु प्रा.जी.डी. यादव यांच्या हस्ते होणार असुन गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश,पंजाब,दिल्ली, जम्मु-कश्मिर, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, कर्नाटक,गोवा,मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधुन संशोधक विद्यार्थी, शास्त्रज्ञ व प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेत दक्षिण आफ्रिकेतील प्रा.श्रीकांता जोन्नलगड्डा, दक्षिण कोरियातील प्रा.सोहन देवोन, मॅक्सिकोतील डॉ. मारिसेला मार्टिनेझ, डॉ.प्रियंका मक्कर यांची व्यांख्याने होणार आहेत. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.आर.डी.कुलकर्णी आणि पुणे येथील आयसर संस्थेचे डॉ.ए.ए.नातू यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल. या परिषदेत संशोधक विद्यार्थ्यांना मौखिक व पोस्टरच्या माध्यमातुन शोधनिबंध सादर करता येणार आहे. ३१ ऑगस्ट पर्यंत सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे व या परिषदेचे निमंत्रक प्रा.डी.एस.दलाल यांनी केले आहे.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ — दिनांक: २३ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी